# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः21.07.2024** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या,**

- बांग्लादेशातल्या हिंसाचाराच्या पार्श्वभुमीवर, एक हजार भारतीय विद्यार्थी सुरक्षित मायदेशी परत,
- नीट परीक्षा प्रश्नपत्रिकाफुटी प्रकरणी मुख्य सूत्रधार शशिकांत पासवानसह आणखी तीन संशयितांना सीबीआयकडून अटक.
- अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला केंद्रात आज सर्वपक्षीय बैठकीचं आयोजन,

आणि

- पुढील चार दिवसांत देशात अनेक ठिकाणी मुसळधार पावसाचा हवामान विभागाचा अंदाज

**बांग्लादेश विद्यार्थी**

बांग्लादेशात आरक्षणाविरोधात सुरू असलेल्या हिंसक निदर्शनांच्या पार्श्वभुमीवर, तिथले अंदाजे एक हजार भारतीय विद्यार्थी काल मायदेशी परतले. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार, 778 विद्यार्थी जलमार्गानं तर दोनशे विद्यार्थी ढाका आणि चितगाँग विमानतळावरून सुटणाऱ्या नियमित विमानसेवेद्वारे मायदेशी परतले. मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार, ढाक्यातील भारतीय उच्चायुक्तालय तसंच चितगाँग, राजशाही, सिलहेट आणि खुलना इथल्या सहायक उच्चायुक्तांनी भारतीय नागरिकांना मायदेशी परतण्यात सहाय्य केलं. या नागरिकांना भारत - बांग्लादेश आंतरराष्ट्रीय सीमा सुरक्षितपणे ओलांडण्यासाठी देखील उपाययोजना केल्या जात आहेत. भारतीय नागरिकांचा प्रवास सुरक्षित व्हावा यासाठी, नागरी विमान वाहतूक, स्थलांतर, विमानतळ प्राधिकरण तसंच सीमा सुरक्षा दल यांच्या अधिकाऱ्यांशी ते संपर्कात आहेत. ढाका इथलं उच्चायुक्तालय, सहउच्चायुक्तालय अजूनही बांग्लादेशातल्या विविध विद्यापीठात शिकणाऱ्या चार हजार विद्यार्थ्यांना आवश्यक सहकार्य देण्यासाठी त्यांच्या संपर्कात असून, नेपाळ तसंच भूतान या देशांतील विद्यार्थ्यांनाही भारतात परतण्यास मदत करण्यात येत असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**नीट-यूजी पेपरफूट**

नीट-यूजी प्रश्नपत्रिका फूट प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने आणखी 3 संशयितांना अटक केली आहे. यामध्ये मुख्य सुत्रधार शशिकांत पासवान आणि 2 विद्यार्थ्यांचा समावेश आहे. अटक करण्यात आलेले विद्यार्थी भरतपूर मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी आहेत. या विद्यार्थ्यांपैकी एक, प्रथम वर्षाचा, तर दुसरा, द्वितीय वर्षाचा विद्यार्थी आहे. हे सर्व जण प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी 5 मे रोजी सकाळी हजारीबागेत उपस्थित होते. यापूर्वी, 19 जुलै रोजी सीबीआयने नीट-यूजी प्रश्नपत्रिका फूट प्रकरणी झारखंडमधील रांची येथून एमबीबीएसच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनीला ताब्यात घेतले असल्याचं  हिंदुस्थान समाचार या वृत्तसंस्थेनं आपल्या बातमीत म्हटलं आहे.

**नड्डा स्वानिधी**

पंतप्रधान स्वनिधी योजना सुरू झाल्यापासून केंद्रानं विक्रेत्यांना आतापर्यंत आठ हजार सहाशे कोटी रुपयांचा निधी वाटप केलं असल्याची माहिती आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी. नड्डा यांनी काल दिली. नड्डा यांच्या हस्ते काल रस्त्यावरील खाद्य पदार्थ विक्रेत्यांसाठी अन्नसुरक्षेसंदर्भातल्या पोर्टलचे उद्घाटन करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. यावेळी या विक्रेत्यांसाठी अन्नसुरक्षेसंदर्भात मार्गदर्शक तत्वंही जारी करण्यात आली. दिल्लीत काल, भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाच्या वतीनं रस्त्यावरील खाद्यपदार्थ विक्रेत्यांचं प्रशिक्षण आणि जागरुकता कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. या विक्रेत्यांसाठी असलेले शंभर रुपयांचं नोंदणी शुल्क प्राधिकरणानं माफ करावं, जेणेकरून अधिकाधिक विक्रेत्यांना नोंदणी करण्यास प्रोत्साहन मिळेल असा सल्लाही नड्डा यांनी दिला.

**अर्थसंकल्प**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला उद्यापासून सुरुवात होत आहे. यानिमित्तानं केंद्र सरकारनं आज सर्वपक्षीय बैठक आयोजित केली आहे. अधिवेशन काळात दोन्ही सदनांचं कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी  सर्व पक्षांनी सहकार्य करावं, असं आवाहन या बैठकीत करण्यात येणार आहे. हे अधिवेशन 12 ऑगस्टपर्यंत चालणार असून, मंगळवारी 23 तारखेला केंद्रीय अर्थसंकल्प सादर करण्यात येईल.

**मोहोळ**

सहकार क्षेत्रासाठी नवीन मंत्रालय स्थापन करून केंद्रातील मोदी सरकारनं गेल्या 10 वर्षात जे सकारात्मक आणि धाडसी निर्णय घेतले त्यामुळे कृषी आणि सहकार क्षेत्र अधिक बळकट होत असल्याचं  केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी म्हटलं आहे. पुण्यातील वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्थेच्या वार्षिक पदवीदान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते काल

बोलत होते. संस्थेमधील कृषी आणि कृषी क्षेत्राशी संलग्न अभ्यासक्रमाच्या 32 व्या तुकडीतील 99 विद्यार्थ्यांना या वेळी मोहोळ यांच्या हस्ते पदव्युत्तर पदविका प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले .

**भाजपा**

आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज पुण्यात भारतीय जनता पक्षाचं महाअधिवेशन होत आहे. या अधिवेशनात 5300 पदाधिकारी सहभागी होणार असल्याची माहिती भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत दिली. पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते अधिवेषणाचं उद्घाटन होणार असून रावसाहेब दानवे, आमदार आशिष शेलार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सकाळच्या सत्रात मार्गदर्शन करणार आहेत. तर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या भाषणानं या महाअधिवेशनाचा समारोप होणार आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्यभरात  काढल्या जाणाऱ्या संवादयात्रांच्या आराखड्याला यावेळी अंतिम स्वरूप दिलं जाण्याची शक्यता आहे .

**चांदीपुरा**

आरोग्य सेवा महासंचालनालयांचे संचालक अतुल गोयल यांनी चांदीपुरा विषाणू प्रकरण आणि गुजरात, राजस्थान आणि मध्यप्रदेशातील तीव्र एन्सेफलायटीस सिंड्रोम म्हणजेच मेंदूशी संबंधित आजाराचा काल आढावा घेतला. त्या अनुषंगाने उद्भवलेल्या परीस्थितीवर तपशीलवार चर्चा आणि पुनरावलोकन केल्यानंतर संक्रामक घटकांमुळे  ही परिस्थिती निर्माण झाली असल्याचा  निष्कर्ष तज्ञांनी काढला आहे. तीव्र एन्सेफलायटीस सिंड्रोम हा वैद्यकीयदृष्ट्या समान चेतासंस्थात्मक घटकांचा समूह असून ते विविध विषाणू, जीवाणू, बुरशी, परजीवी आणि इतर रसायनांमुळे तयार होतात. चांदीपुरा इथं आढळलेला  विषाणू हा देशाच्या पश्चिम, मध्य आणि दक्षिणेकडील भागात आढळून येतो आणि विशेषत: पावसाळी हंगामात त्याचा उद्रेक होतो. माशा आणि गोचीड यांद्वारे हे विषाणू पसरतात. प्रतिबंध , स्वच्छता आणि जागरूकता हेच या रोगाचा प्रतिबंध करण्याची त्रीसूत्री आहे.

**भारत-भूतान**

भारत-भूतान यांच्यादरम्यानची  तिसरी विकास सहकार्य चर्चा, परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी आणि भूतानचे परराष्ट्र सचिव ओम पेमा चोडेन यांच्या अध्यक्षतेखाली काल पार पडली. या चर्चेदरम्यान भूतानच्या बाजूने प्रकल्प संबंधित सहाय्य प्रस्तावासह, तेराव्या पंचवार्षिक योजना कालावधीत राबवण्यात  येणाऱ्या प्रकल्पसंबंधी सहाय्यता प्रस्ताव सादर करण्यात आले. परराष्ट्र मंत्रालयाच्या निवेदनानुसार, उभय देशांच्या सचिवांनी विविध क्षेत्रातल्या 4958 कोटी रुपयांच्या 61 प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. हे प्रकल्प, पायाभूत सुविधा, उर्जा, कौशल्य विकास, शिक्षण, आरोग्य, सांस्कृतिक वारसा, क्षमताउभारणी, क्रीडा, युवा देवाणघेवाण, डिजीटल अर्थव्यवस्था तसंच अवकाश तंत्रज्ञान या

क्षेत्रांशी निगडीत आहेत. त्याशिवाय, उभय देशांमध्ये विकास भागीदारी, उर्जा, व्यापार आणि गुंतवणूक यासह द्वीपक्षीय सहकार्याच्या सर्व पैलूंवरही चर्चा झाली. परराष्ट्र सचिव म्हणून विक्रम मिस्त्री यांचा हा पहिलाच परदेश दौरा होता.

**नेपाळ विश्वास**

नेपाळमध्ये नवनियुक्त पंतप्रधान केपी शर्मा ओली आज संसदेत विश्वासदर्शक ठराव मांडतील. नेपाळच्या घटनेनुसार, नवनियुक्त पंतप्रधानांनी तीस दिवसांच्या आत संसदेत विश्वासदर्शक ठराव मांडणे बंधनकारक आहे. ओली यांनी चौथ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली आहे.

**परदेशी गुंतवणूक**

परदेशी गुंतवणुकदारांनी भारतीय शेअर बाजारात ,गुंतवणुकीचा वेग कायम ठेवल्याने या महिन्यात आत्तापर्यंत रोखे आणि कर्जामध्ये 44344 कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. देशातल्या डिपॉझिटरीजनी दिलेल्या आकडेवारीनुसार, विदेशी गुंतवणुकदारांनी 30 हजार 771 कोटी रुपये रोखे आणि 13573 कोटी रुपये कर्जात गुंतवले आहेत. वाहन उद्योग, भांडवली वस्तू, आरोग्य सेवा, माहिती तंत्रज्ञान, दूरसंचार तसेच तेल वायू क्षेत्रामध्ये या खरेदीदारांनी गुंतवणूक केली आहे. चालू आर्थिक वर्षात रोखे आणि कर्ज या दोन्हींमध्ये दोन लाख 82 हजार 338 कोटी रुपयांची निव्वळ गुंतवणूक होती. सकारात्मकता आणि सुधारणावादी स्थिर सरकारचा भरवसा ही भांडवली बाजारात तेजी येण्याची कारणं आहेत.

**HERITAGE**

भारतात प्रथमच नवी दिल्ली इथं जागतिक वारसा समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात येणार आहे. भारतासाठी  ही अत्यंत आनंदाची बाब असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमांवर म्हटलं आहे. देशाचा वारसा जतन करण्याच्या मार्गांवर विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी ही बैठक एक महत्त्वाचं व्यासपीठ असल्याचंही मोदी यांनी म्हटलं आहे. आज संध्याकाळपासून या कार्यक्रमाला सुरुवात होत आहे.

**WOMEN'SASIACUP**

श्रीलंकेत सुरू असलेल्या महिला आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना संयुक्त अरब अमिराती संघाविरुद्ध होणार आहे. डांबूला इथे हा सामना खेळला जाईल.

**IMD-WEATHER**

भारतीय हवामान विभागाने पुढील चार दिवसांत कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेशात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. आज विदर्भ, छत्तीसगड, किनारी कर्नाटक, उत्तराखंड, पश्चिम उत्तर प्रदेश, हरियाणा, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, मराठवाडा, किनारी आंध्र प्रदेश, यानम आणि तेलंगणमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. तसच नवी दिल्लीमध्येही हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. राजस्थान, हिमाचल प्रदेश, पंजाब, बिहार, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये बुधवारपर्यंत मुसळधार पावसाचा अंदाज हवामान संस्थेने वर्तवला आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**